# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०४/२०२५ (बुधवार)**

---

**अवैधरित्या देशी , मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई**
**१९ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद. एकूण ४५,१०५ /— रू. चा मुद्देमाल जप्त**

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. उमरेड हद्दीतील मौजा **गडेपार** येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टी वर छापा टाकूण एकूण ६० लिटर मोहफुलाची दारू कि. ६०००/— रू. ची मोहफुलाची दारू, ४०० किलो मोहफुलांचा सडवा किं. १४,०००/— रू आणि दारू काढण्यासाठी वापरण्यात येणारे ड्रम व साहित्य किं. ४८००/— रू. असा एकूण किंमती २४,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकूण **२ आरोपींविरूध्द २ गुन्हे दाखल केले आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. जलालखेडा हद्दीतील मौजा **उमठा** येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण ७०००/— रू. ची मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. एकूण **३ आरोपींविरूध्द ३ गुन्हे दाखल केले आहे.**

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. केळवद हद्दीतील मौजा **तिडंगी पारधी बेडा** येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण ८५५०/— रू. ची मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. **एकूण ७ आरोपींविरूध्द ७ गुन्हे दाखल केले आहे.**

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. कुही हद्दीतील मौजा **पाचगाव, वडद व कळमणा** येथे अवैधरित्या देशी भिंग्री व मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण २२७०/— रू. ची देशी भिंग्री व मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. **एकूण ४ आरोपींविरूध्द ४ गुन्हे दाखल केले आहे.**

त्याचप्रमाणे **पो.स्टे. खापा, भिवापूर आणि मौदा पोलीसांनी सुध्दा** त्यांच्या पो.स्टे. हद्दीत अवैधरित्या देशी भिंग्री व मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण २४८०/— रू. ची देशी भिंग्री व मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. **एकूण ३ आरोपींविरूध्द ३ गुन्हे दाखल केले आहे.**

**(अशाप्रकारे एकूण १९ आरोपीविरूध्द १९ गुन्हे नोंद व एकूण ४५,१०५ /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. श्रेणी पोउपनि राजेश दिवाकर रामटेके नेमणूक पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा २. कनिष्ठ श्रेणी लिपीक धनराज कचरूजी डोंगरे नेमणूक पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, श्री. विजय माहुलकर, पोलीस उपअधिक्षक(गृह), नागपुर

जिल्हा ग्रामीण, मानव संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अजय मानकर व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने